महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.तंशिप्र-१२२६/प्र.क्र.०७/जास्वीशु/सूचना/केंप्रप्र/२०२६/१८९७ दिनांक - ०४.०८.२०२६

जाहीर सूचना

दिनांक १९ जुलै, २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली "शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशासाठी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया (CAP) अंतर्गत जागा स्वीकृती शुल्कामध्ये करण्यात आलेल्या सुधारणेबाबत" जाहीर सूचना रद्द करण्याबाबत.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रिया (CAP) अंतर्गत जागा स्वीकृती शुल्कामध्ये करण्यात आलेल्या सुधारणेबाबत दिनांक १९ जुलै, २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहीर सूचनेसंदर्भात विद्यार्थी, पालक, शैक्षणिक संस्था तसेच विविध संघटनांकडून विविध निवेदने व सूचना प्राप्त झाल्या आहेत.

त्याअनुषंगाने, सदर विषयाचा पुनर्विचार करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने घेतला असून, दिनांक १९ जुलै, २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली उक्त जाहीर सूचना याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

त्यामुळे, यापूर्वीप्रमाणे इतर विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांप्रमाणे प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) अंतर्गत जागा स्वीकृती शुल्क रुपये १,०००/- (रुपये एक हजार फक्त) आकरण्यात येईल. याची सर्व संबंधित विद्यार्थी, पालक तसेच शैक्षणिक संस्थांनी नोंद घ्यावी.

सही/-
आयुक्त
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा
(सीईटी) कक्ष, मुंबई